मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत

अब्राहामास देवाचे अभिवचन

लेखक: Edward Hughes
रेखाचित्रकार: Byron Unger; Lazarus Alastair Paterson
रूपान्तरकार: M. Maillot; Tammy S.
अनुवादक: Rev. Shilas Gavit
निर्माता: Bible for Children
www.M1914.org

BFC
PO Box 3
Winnipeg, MB R3C 2G1
Canada

©2022 Bible for Children, Inc.
परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.

जलप्रलयाच्या फार फार नंतर, पृथ्वीवरील लोकांनी एक योजना आखली. त्या काळी पृथ्वीवरील सर्व लोकांची भाषा एकच होती. ते एकमेकांस म्हणाले, "आपण एक मोठे शहर आणि आकाशाला भिडणारा उंचच उंच बुरुज (मनोरा) बांधू याप्रकारे आपली इतरत्र पांगापांग होणार नाही."

त्याने बनविलेल्या संपूर्ण पृथ्वीवर लोकांनी
वस्ती करावी अशी देवाची इच्छा होती.
यामुळे त्याने काहीतरी विशेष केले.
अचानक लोकसमुह वेगवेगळी भाषा बोलू
लागले. देवाने त्यांना नवनविन भाषा दिल्या.

एकसारखी भाषा बोलणारे एकत्रित होऊन एका बाजूला निघून गेले. खरेतर ज्यांची भाषा त्यांना समजत नव्हती त्यांना ते घाबरु लागले. याप्रकारे देवाने लोकांना वेगवेगळ्या देशांत पांगविले व लोग वेगवेगळ्या देशात जाऊन राहिले. जे शहर सोडून ते निघून गेले होते त्या शहराचे नाव बाबेल म्हणजे गोंधळ असे पडले.

पुष्कळ वर्षांनंतर, खास्द्यांच्या ऊर येथे परमेश्वर अब्राम नावाच्या मनुष्याशी बोलला. देवाने आज्ञा केली की, "हा देश सोडून मी दाखविन त्या देशात जा."



अब्रामने आज्ञापालन केले. देवाने त्याला कनानात नेले. त्याची पत्नी साराय आणि पुतण्या लोट हे देखिल त्याच्यासोबत गेले.



कनानात, अब्राम व लोट हे दोघे देखिल श्रीमंत बनले. त्यांच्याजवळ जनावरांचे मोठे कळप होते. एवढ्या जास्त जनावरांसाठी तेथे पुरेसे कुरणे नव्हती.



लोटाचे गुराखी व अब्राहामाचे गुराखी यांच्यात भांडणे होऊ लागली होती. म्हणून अब्राम लोटाला म्हणाला, "आपल्यामध्ये भांडणे नसावीत, या प्रदेशातील तुला हव्या असलेल्या भागाची आधि तू निवड कर आणि मग आपण विभक्त होऊ या."

लोटाने गांवे व शहरे आणि विपुल कुरणे असलेला तळवटीचा भाग निवडून घेतला. तो भाग दिसण्यास सुंदर होता. परंतु ती शहरे दुष्टाईने भरलेली होती.





लोट सोडून निघून गेल्यावर, पुन्हा एकदा परमेश्वर अब्रामाशी बोलला. "मी तुला व तुझ्या संततीला कनान देश कायमचा देईन." अब्राम आणि साराय यांना मुलबाळ नव्हते. तर परमेश्वर त्याचे महान अभिवचन कसे पुर्ण करिल?



ते म्हणाले, "लवकरच तुला मुलगा होईल." पण सारा हसली. तीने देवाच्या संदेशावर विश्वास केला नाही. ती आता नव्वद वर्षाची झाली होती. देवाने अब्रामला म्हटले, तुला आता अब्राहाम ("म्हणजे श्रेष्ठपिता" किंवा मोठ्या पदास चढलेला पिता) असे म्हणतील आणि सारायला सारा (म्हणजे "राणी") असे म्हणतील.

तसेच सदोम आणि गमोरा या दोन
दुष्ट शहरांचा देव नाश करणार
आहे हे देखिल देवाने अब्राहामला
सांगितले. अब्राहामचा पुतण्या लोट
हा त्याच्या कुटुंबासह सदोमात
राहात होता.

देवाची चेतावनी आल्यावर
लोटाने त्याच्यावर विश्वास
केला परंतु त्याच्या मुलींचे
पती सदोमातून बाहेर
निघण्यास तयार नव्हते.
हे कित्ती दुःखदायक होते!
त्यांनी देवाच्या वचनावर
विश्वास केला नाही.

केवळ लोट आणि त्याच्या
मुली सुरक्षित राहु शकल्या.
त्या दुष्ट शहरांवर अग्नि व
गंधक यांचा वर्षाव झाला.

दुःखाची गोष्ट अशी की, लोटाची बायको पळत असतांना तिने देवाच्या चेतावनीकडे दुर्लक्ष केले आणि मागे वळून पाहिले. आणि ती मिठाचा खांब झाली.



अब्राहाम व साराय
यांना दिलेले वचन
परमेश्वराने पाळले.
परमेश्वराने
सांगितल्याप्रमाणे
त्यांच्या म्हातारपणात
त्यांना मुल झाले. जेंव्हा
इसहाकाचा जन्म झाला
तेंव्हा त्यांना कित्ती
आनंद झाला !

त्याला व त्याच्या संततीला
देवाने कनान देश कायमचा देऊ
केला होता या अभिवचनावर
देखिल अब्राहामने कदाचित
विचार केला असेल. परमेश्वर ते
वचन देखिल राखील.
परमेश्वर त्याची वचने सदैव
राखतो.



अब्राहामास देवाचे अभिवचन

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

उत्पत्ति ११-२१

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०


समाप्त

बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर परमेश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची अशी इच्छा आहे की आम्ही त्याला ओळखावे.

परमेश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मरण आहे, पण परमेश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याला तुमच्या पापांची शिक्षा मिळावी आणि वधस्तंभावर मरावे म्हणून त्याच्या एकुलता एक पुत्र येशू याला पाठविले. नंतर येशू जिवंत झाला आणि स्वर्गातील घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

हे सत्य आहे यावर जर तुम्ही विश्वास ठेवता, तर परमेश्वराला हे सांगा:
प्रिय येशू, तू परमेश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मरण पावण्यास मनुष्य बनला आणि आता तू जिवंत आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांची मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एके दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी
येईन. तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर. आमेन.

बाइबल वाचा आणि परमेश्वराशी रोज बोला! योहान 3:16